जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

दुरध्वनी क्र.02452-222644 - फॅक्स क्र.02452-223774 - ई-मेल - dpo.pbn@gmail.com

संदर्भ :- 1. महाराष्ट्र शासन, नियोजन विभागाचे शासन निर्णय क्र.जिवायो 1007/प्र.क्र.39/का-1444, दि. 16 फेब्रुवारी, 2008

2. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाचे शासन निर्णय क्र.जिवायो-2010/प्र.क्र.26/नवि-4, दि. 08 फेब्रुवारी, 2011

3. जिल्हा प्रशासन अधिकारी, परभणी यांचे निधी मागणी पत्र क्र.2019/नपाप्र/आस्था01/कावि, दि. 15.01.2019

4. जिल्हा प्रशासन अधिकारी, परभणी यांचे निधी मागणी पत्र क्र.2019/नपाप्र/लेखा-01/कावि, दि. 30.01.2019

जा.क्र.जिनिस/जिवायो-18-19/प्रशासन अधिकारी/नि.वि./का.क्र.1/ 304 दि.5 जानेवारी, 2019

**जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) 2018-19 अंतर्गत निधी वितरण आदेश**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2018-19 अंतर्गत नागरी दलितेत्तर वस्त्यांमध्ये सुधारणा या योजनेसाठी रु.300.00 लक्ष तरतूद मंजूर असून त्यापैकी रु.210.00 लक्ष BDS वर प्रणालीवर उपलब्ध झालेली आहे.

जिल्हा प्रशासन अधिकारी, परभणी यांनी संदर्भ क्र.3 व 4 अन्वये खालील परिशिष्टात दर्शविलेल्या नागरी दलितेत्तर वस्त्यांमध्ये सुधारणा या योजनेतंर्गत खालील परिशिष्टामध्ये दर्शविलेल्या कामाचा प्रशासकीय मान्यता आदेशासह निधी मागणीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास अधिन राहून व उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मी जिल्हाधिकारी, परभणी या आदेशान्वये खालील परिशिष्ट - अ मध्ये दर्शविलेल्या सन 2017-18 मधील अपूर्ण कामासांठी **रु.103.28 लक्ष (अक्षरी रुपये एक कोटी तीन लक्ष अठ्ठावीस हजार फक्त)** रक्कम वितरीत करण्यात येत आहे.

**परिशिष्ट - अ** (सन 2017-18 मधील अपूर्ण कामासांठी)

(रु. लाखात)

| अ क्र | योजनेचे नाव / कामाचे नाव | प्र.मा. दिनांक | प्र.मा. रक्कम | मार्च 2018 अखेर कामावर वितरित / खर्च | या आदेशान्वये वितरित निधी |
|---|---|---|---|---|---|
| | **जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर पालीका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी** | | | | |
| | **नागरी दलितेत्तर वस्त्यांमध्ये सुधारणा अंतर्गत -** | | | | |
| 1 | **पालम** - वार्ड क्र 17 मध्ये लक्ष्मीकांत मालेवार यांच्या घरापासून ते अशोक लोखंडे यांच्या घरापर्यत सी.सी. रस्ता बांधकाम करणे | 31.3.2018 | 13.91 | 0.00 | 13.91 |
| 2 | **गंगाखेड** - मन्नाथ नगर परिसरात मेटल सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे प्र.क्रं.12 | 31.3.2018 | 59.95 | 0.00 | 59.95 |
| 3 | **जिंतुर** - भराडे यांचे घर ते होडबे यांचे घर ते सानप यांचे घर ते कदम यांचे घर ते जाधव यांचे घरापर्यत सी.सी. रस्ता बांधकाम करणे गणेश नगर प्र.क्रं.7 | 13.3.2018 | 40.00 | 11.86 | 28.14 |
| 4 | **सेलू** - प्रभाग क्रं.10 अत्रेनगर येथे सिमेंटरोड व आरसीसी नाली बांधकाम करणे सीसी रोड तहसील रोड ते डख यांचे घर | 22.2.2018 | 10.31 | 54.48 | 1.28 |
| 5 | **सेलू** - शिवाजी पुतळा ते मठ गल्ली पर्यत 24 मी रुंद रस्त्याचे दुभाजकाचे कामे करणे | 22.2.2018 | 8.68 | | |
| 6 | **सेलू** - प्रभाग क्रं.11 विभागीय अधिकारी यांचे निवासस्थान ते रवी डासाळकर यांचे घरापर्यत सिमेंट रोड करणे. | 22.2.2018 | 15.80 | | |
| 7 | **सेलू** - गायत्री नगर येथील स्मशानभूमीचा विकास करणे | 22.2.2018 | 20.97 | | |
| | एकूण | | **169.62** | **66.34** | **103.28** |

**(अक्षरी रुपये एक कोटी तीन लक्ष अठ्ठावीस हजार फक्त)**

**अटी व शर्ती**

1. सदर कामाची/योजनेची अंमलबजावणी आपल्या प्रशासकीय विभागाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचना / निकषानुसारच करण्यात यावी तसेच शासन स्तरावर मंजुर केलेल्या कामाची व्दिरुक्ती होणार नाही व सदरीचे काम अनुज्ञेय आहे याची खात्री करावी.

2. सदरील कामांवर प्रशासकिय मान्यता दिलेल्या रक्कमेच्या अधिन राहूनच खर्च करण्यात यावा. तसेच सदरील कामे अन्य कोणत्याही निधीमधून घेण्यात आली नाही याची खात्री करावी.

3. सदरील निधी ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आलेला आहे त्या विनिर्दिष्ट प्रयोजनासाठीच तसेच नामफलक सदर जागेवर असल्याची खात्री करुनच निधी खर्च करण्यात यावा इतर कोणत्याही योजनेवर/कामावर खर्च करण्यात येवू नये.

4. या योजनेंतर्गतच्या कामांना आवश्यक असलेली प्रशासकिय मान्यता/ तांत्रिक मंजूरी सक्षम प्राधिकाऱ्याकडून घेण्याची तसेच सदर कामांना जिल्हा नियोजन समितीची मान्यता घेण्याची जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहिल, तसेच या आदेशान्वये वितरीत केलेल्या निधी अंतर्गत घेण्यात आलेल्या कामांची पुनरावृत्ती झालेली नाही. कामाची पुनरावृत्ती झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहिल. या अटीवरच निधी वितरीत करण्यात येत आहे.

5. नागरी दलितेतर वस्त्यांमध्ये सुधारणा व महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियानासाठी नगर पलिकांना महानगर पालिकांना अनुदाने या योजनांसाठी शासन निर्णयांनुसार निधी खर्च करण्यासाठी शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सुचना/निकषांनुसारच निधी खर्च करण्यात यावा. या कामांना लागणारा उर्वरीत निधी नगर परिषदेने टाकून काम पुर्ण करावे. तसेच जिल्हा नियोजन समितीची कार्योत्तर मंजूरी घेण्याची जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

6. या योजनेंतर्गत वितरीत करण्यात आलेल्या निधीचे उपयोगीता प्रमाणपत्रे, कामाचे पुर्णत्वाचे दाखले, महालेखापाल यांचे कार्यालयातील अभिलेखाशी खर्चाचे ताळमेळ घालून ताळमेळाची एक प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

7. या योजनेंतर्गत होणाऱ्या खर्चाचे हिशेब स्वतंत्रपणे ठेवण्यात यावा आणि दरमहा 5 तारखेपुर्वी या कार्यालयास प्रगती अहवाल सादर करावा. निवडणुक आयोगाने वेळोवेळी निवडणुका संदर्भातील आचार संहितेचे निर्गमित आदेश विचारात घेवून योग्य ती कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात यावी.

8. आवश्यक असलेल्या कामाबाबत निविदा मागविणे, स्विकृत करणे तसेच खरेदी बाबतचे सर्व अधिकार प्रचलित पध्दतीनुसार राहतील.

9. या योजनेच्या अंमलबजावणीवर, खर्चावर व तांत्रिक बाबीवर संबंधित मंत्रालयीन प्रशासकिय विभागाचे नियंत्रण राहिल.

10. या योजनेतील गैरव्यवहार, लेखा आक्षेप, लोक लेखा समिती, विधीमंडळ, कामकाज इत्यादी बाबींसाठी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा व त्याचे मंत्रालयीन प्रशासकिय विभाग जबाबदार राहिल.

11. या आदेशान्वये वितरीत करण्यात येत असलेला निधीचा खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा.

| **नागरी दलितेतर वस्त्यांमध्ये सुधारणा** |
|---|
| लेखाशिर्ष - नियोजन विभाग - मागणी क्रमांक महसुली ओ-50<br>2217, नगर विकास<br>80 सर्वसाधारण<br>192, नगर परिषदांना सहाय्य<br>(49) जिल्हा योजना – परभणी<br>(49)(05) नागरी दलितेतर वस्त्यांमध्ये सुधारणा कार्यक्रम (2217 9652)<br>31, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) |

प्रति,
जिल्हा प्रशासन अधिकारी,
परभणी

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी

प्रत - माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
1. महालेखापाल कार्यालय, नागपूर
2. जिल्हा कोषागार अधिकारी, परभणी
3. निवड नस्ती

स्वा/-
जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी